यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणा-या ‘शिका व कमवा’ या योजनेसाठी <u>शासनाचे सहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.टिईडी २०११/(६३/११)/तांशि ५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ जून, २०११.

प्रस्तावना :-

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे, यांच्यामध्ये दि.१६-११-२०१० रोजी एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. उक्त सामंजस्य करारातील तरतूदीनुसार राज्यामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत चालविण्यात येणारे पदवी स्तरावरील अभ्यासक्रम, एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने ‘शिका व कमवा’ या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणार आहेत.

१.२. १० व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत रोजंदारीचा एकूण आढावा घेऊन कुशल आणि प्रशिक्षित कामगारांना प्रशिक्षण देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यानुसार ५० कोटी कुशल व तंत्र शिक्षण आधारीत प्रशिक्षण देऊन मनुष्यबळ उत्पन्न करावयाचे आहे. ‘स्किल डेव्हलपमेंट इनिशिएटीव्ह’ या योजनेंतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयाचा मोठया प्रमाणात वाटा असून, त्यानुसार यापूर्वीच औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करीत असलेल्या विद्यार्थ्यांना किंवा औद्योगिक क्षेत्रामध्ये सामावून घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांना <u>स्किल डेव्हलपमेंट आणि स्कील अपग्रेडेशन’</u> या कार्यक्रमात सहभाग करुन घेणे क्रमप्राप्त ठरणार आहे. याकरीता सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांनी आपापसात भागीदारी तत्वावर काम करणे आवश्यक आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणा-या ‘शिका व कमवा’ या योजनेअंतर्गत पदवी स्तरावरील अभ्यासक्रम शिकत असताना राज्यभरातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना on the job प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योगधंद्यामध्ये सामावून घेण्यात येणार आहे. या कालावधीत त्यांना विद्यावेतन देखील देण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत तंत्रशिक्षण तसेच विद्यावेतन हे दोन्ही फायदे एकाच वेळी प्राप्त होणार आहेत. या उपक्रमांतर्गत येणारा संपूर्ण खर्च उपभोक्ता म्हणून उद्योजकांकडून सोसण्यात येणार आहे. <u>त्यामुळे प्रत्यक्षात शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार पडणार नाही.</u>

१.३. वरील पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणा-या ‘शिका वा कमवा’ या योजनेला शासनाचे सहकार्य देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन होता. उक्त प्रस्तावाचा सर्वांगीण विचार करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णयः-</u>

२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणा-या ‘शिका व कमवा’ या उपक्रमांतर्गत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना, पदवी स्तरावरील प्रशिक्षणाकरीता, शासनाचे सहकार्य म्हणून उपलब्धतेनुसार राज्यातील सर्व शासकीय

तंत्रनिकेतने, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, यांमधील प्रयोगशाळा, कार्यशाळा, वर्ग खोल्या इ.,संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी संचालनालय स्तरावर अवलंबविण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार विद्यापिठाने ठरविलेल्या शिक्षण शुल्काच्या २५% इतकी रक्कम संबंधित शासकीय संस्थाना भाड्यापोटी अदा करण्याच्या अटीच्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यात यावे.

३. 'शिका व कमवा' या उपक्रमांतर्गत सहभाग असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना on the job प्रशिक्षण उद्योग व्यवसायामध्ये देण्यात येते. सदर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना पदवी प्रमाणपत्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत देण्यात येणार आहे, ही बाब विचारात घेऊन, प्रशिक्षणार्थीना 'ॲप्रेंटिसशिप कायदा १९६१' मधील तरतूदीचे तसेच त्याअंतर्गत असलेल्या नियमांचे (Rules) सर्व संबंधीतांनी तंतोतंत पालन करण्याच्या अटीच्या अधिन राहून त्यांना सहा महिने ते चार वर्ष कालावधीपर्यंत 'ॲप्रेंटिस' म्हणून संबोधण्यात यावे.

४. उक्त प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षणाचा कालावधी चार वर्षापलिकडे जाणार नाही याची काळजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यापिठाने घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांना ॲप्रेंटिसशिप कायदा १९६१ मधील तरतूदीनुसार अनुज्ञेय ठरविलेल्या किमान विद्यावेतन किंवा उद्योजकांनी देऊ केलेले रुपये ५०००/- ते रु. ८०००/- विद्यावेतन यापैकी जे अधिक असेल ते विद्यावेतन संबंधित उद्योजक यांच्याकडून देण्यात यावे.

५. विद्यार्थ्यांसाठी साधनसामुग्री, पाठयपुस्तके व साहित्य, इत्यादी आणि प्रशिक्षणावरील इतर सर्व खर्चाचा भार ज्या कारखान्यामध्ये विद्यार्थी प्रशिक्षण घेत असतील त्या उद्योजक आस्थापना सोसतील.

६. सर्व सहभागी उद्योजक आस्थापनांनी प्रशिक्षणार्थींच्या आरोग्य, सुरक्षा व कल्याण विषयक तरतूदींचे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. म. अंबादे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) एम.पी.ट्रेनिंग ॲकॅडमी लि., पुणे,
४) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रा (पूर्व), मुंबई ५१.
५) सर्व प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतने,
६) सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,
७) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
८) मा.प्र.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सचिव.
९) मा.उप.सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
१०)निवड नस्ती, तांशि-५.